नि. फौ ख. क्र. १४६/ २०२४
नि २२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ चा पुरावा**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,

माझे नावः– निळकंठ रंगनाथ कारखेले,
वयः– ४० वर्षे
धंदाः– पोलीस हेड कॉन्स्टेबल
राः– सायबर पोलीस स्टेशन, अहमदनगर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एस. यादव यांचेमार्फत सुरुः–**

मी सायबर पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे दिनांक ०१.०५.२०२२ रोजीपासून कार्यरत आहे. श्रध्दा वाघस्कर यांनी त्यांचे इन्स्टाग्राम, फेसबुक, ई–मेल अकाउंट हॅक झाल्याबाबत तक्रारी अर्ज दिलेला होता. सदर अर्ज दिनांक २३.०९.२०२३ रोजी आला होता. सदर अर्ज माझ्याकडे आल्यानंतर इन्स्टाग्राम, फेसबुक, गुगल या तिन्ही कंपनीशी या तक्रारीची माहिती मिळण्याकरीता पत्रव्यवहार केला. त्यानंतर दिनांक ०९.११.२०२३ रोजीपावेतो मला तिन्ही अकाउंटची माहिती मिळाली. मेटा कंपनी व गुगल कंपनीकडून ज्या मोबाईलवरून सदर अकाउंट हॅक झाले होते, त्याचा मोबाईल क्रमांक व आय.पी. एड्रेस प्राप्त झाला. तो मोबाईल क्रमांक ९३२४९९०५२० असा होता. सदर मोबाईल योगेश नवनाथ कोतकर यांच्या नावे होता. या मोबाईल क्रमांकावरील एस.डी.आर. प्राप्त केले होते, ते योगेश नवनाथ कोतकर यांच्या नावे होते. त्याचा पत्ता ऊलवे, मुंबई असा होता. त्याबाबतचे मी पोलीस निरीक्षक यांना पत्र दिले होते. मला आता दाखविलेले पत्र तेच आहे, त्यामधील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. पत्रास **नि.क्र.२३** देण्यात येत आहे. पोलीस निरीक्षक यांच्या पत्रान्वये वर नमूद माहिती मागविलेली होती.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. डी. गांधी यांचेमार्फत सुरुः–**

२. नि.क्र.२३ च्या पत्रामध्ये पोलीस निरीक्षक यांच्या पत्रान्वये माहिती मागविल्याचे नमूद नाही. मी आजपर्यंत सायबर पोलीस स्टेशनला कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वायफायला एक आय.पी. एड्रेस असतो आणि त्याला चार मोबाईल कनेक्ट होऊ शकतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक मोबाईलला त्याचा स्वतंत्र मॅक आयडी असतो. मॅक एड्रेस बाबत मी कंपनीकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. आय.पी. एड्रेस नि.क्र.२३ मध्ये नमूद नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २३.०९.२०२३ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये तक्रारदाराने त्यांचा मोबाईल हॅक झाल्याबाबत कुठेही नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीस निरीक्षक यांनी सदर गुन्हयात तपास करण्याचे कोणतेही लेखी आदेश दिले नव्हते. या प्रकरणात मी साक्षीदार म्हणून जबाब दिलेला आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपीस नोटीस देवून माझ्यामार्फत आरोपीकडून काहीही जप्ती झालेली नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केलेला संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. नि.क्र.२३ मध्ये मेटा कंपनीकडून आय.पी. एड्रेस मिळाल्याचे नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर नमूद मोबाईल क्रमांक योगेश कोतकर यांच्या नावे नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरीष्ठांच्या सांगण्यानुसार मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृती
Sd/-
(मनिषा द. चराटे – हंपे)
मुख्यन्यायदंडाधिकारी
अहमदनगर

दि. २१/०६/२०२५
अहमदनगर